## जिल्हाधिकारी रायगड यांजकडून

### अधिसूचना

### भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३

क्रमांक भूसंपादन/टे-८/आसूडगाव/एसआर-३५/२०१८/२०१९.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना, दिनांक १७ नोव्हेंबर २०१८ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनिची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे. आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषीत करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र. १ पनवेल यांस पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची एक

(संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन)

**गावाचे नाव आसुडगाव, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक किंवा गट क्रमांक | अंदाजिते क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | स. नं. ५९/८ | ३-७२-३ |

### अनुसूची दोन

(सार्वजनिक प्रयोजनासाठी स्वरूपाबाबत विवरण)

**प्रकल्पाचे नाव.**— नवी मुंबई प्रकल्प

**कामाचे वर्णन.**— मौजे आसुडगाव, ता, पनवेल येथील नवी मुंबई प्रकल्पांतर्गत विकास कार्यासाठी आवश्यक आहे.

**समाजाला होणारा लाभ.**— नवी मुंबई शहराचे औद्योगिक महत्त्व, वाढते नागरीकरण व वाढते पर्यटन याचे महत्त्व विचारात घेता येत्या दशकात नवी मुंबई शहराचा विकास आणि विस्तार वेगाने होईल.

### अनुसूची तीन

(पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन)

बाधित व्यक्तींची विस्थापने करण्यास भाग पाडणारी कारणे :— अशी बाब नाही.

### अनुसूची चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

" निरंक "

**टिप.**— नकाशे पाहण्यासाठी कार्यालयात उपलब्ध आहेत.

डॉ. विजय सुर्यवंशी,
जिल्हाधिकारी, रायगड.

अलिबाग,
दिनांक १ मार्च २०१९.



Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र.१, पनवेल यांचे कार्यालय
सिडको समाज मंदिर बिल्डिंग, पहिला मजला, बांठिया हायस्कूल जवळ, सेक्टर १८,
नवीन पनवेल, ता. पनवेल जि.रायगड ४१० २०६
दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२५१०, फॅक्स क्र. ०२२-२७४५२५१०, email:- dclamc१panvel@ gmail.com

दिनांक :-१९/०३/२०१९

क्र.:भुसंपादन/कात-१/माहिती प्रसिध्द/२०१९

प्रति,
संकेतस्थळ वेग साईट व्यवस्थापक
रायगड जिल्हा संकेतस्थळ तथा
निवासी उपजिल्हाधिकारी व अप्पर जिल्हा दंडाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग रायगड

**विषय :-** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत..

**संदर्भ :-** मा.जिल्हाधिकारी रायगड यांचे कडील पत्र क्र.भूसंपादन/टें-८/आसुडगांव/
एसआर३५/२०१८/२०१९ दिनांक ०२/०३/२०१९

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सादर करण्यात येते की, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ प्रमाणे कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये कलम १९ चे घोषणा पत्र मा.जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांनी दि.०१/०३/२०१९ रोजी घोषित केले आहे. भूसंपादन अधिनियम २०१३ चे कलम १९(४) मध्ये नमुद केलेल्या तरतुदी नुसार प्रसिध्द करावयाचे आहे. तरी सदरची माहिती संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

मी प्रमाणित करते कि जोडलेल्या प्रसिध्द करण्यासाठी दिलेल्या माहिती मध्ये कोणती ही व्यक्तीगत व संवेदनशील माहिती समाविष्ट नाही.

Deshpande

(जयराम देशपांडे)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
मेट्रो सेंटर क्र. १ पनवेल

Scanned by CamScanner